महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

================================================================

जावक क्रमांक – ७१८/३० दिनांक :- ०६ मार्च , २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा नाशिक मंडळातर्फे ५०२ सदनिका विक्रीकरिता ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी २० मार्चपर्यंत मुदतवाढ

## ऑनलाईन/ऑफलाईन अनामत रकमेचा २१ मार्चपर्यंत होणार स्वीकार

मुंबई, दि. ०६ मार्च, २०२५ :- नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) नाशिकमधील मखमलाबाद शिवार, सातपूर शिवार, पाथर्डी शिवार, विहितगाव शिवार, हिरावाडी, म्हसरुळ शिवार, तपोवन द्वारका, वडाळा नाशिक शिवार, पिंपळगाव बहुला, नांदुर दसक, देवळाली, मौजे दसक या ठिकाणी विविध गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत २० टक्के सर्वसमावेशक घटकांतर्गत ५०२ सदनिकांच्या विक्रीकरिता ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज सादर करण्यासाठी दि. २० मार्च, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती नाशिक मंडळाचे मुख्य अधिकारी मुख्य अधिकारी श्री. शिवकुमार आवळकंठे यांनी दिली.

नाशिक मंडळाच्या सदनिका विक्री सोडतीत सहभागी होण्यासाठी ऑनलाइन अर्ज नोंदणीला दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५ रोजी दुपारी २.३० वाजेपासून प्रारंभ झाला. सुधारित वेळापत्रकानुसार अर्जदारांना दिनांक २० मार्च, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी करता येणार आहे. नोंदणीकृत अर्जदारांना २० मार्च २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदारांना ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. दिनांक २१ मार्च, २०२५ रात्री ११.५९ पर्यंत ऑनलाईन अनामत रकमेची स्वीकृती केली जाणार आहे. दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत RTGS/NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांच्या अंतिम यादीची प्रसिद्धी दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर केली जाणार आहे. सोडतीचा दिनांक व वेळ नंतर जाहीर केला जाणार असल्याचे श्री. आवळकंठे यांनी सांगितले.

मुख्य अधिकारी श्री. आवळकंठे म्हणाले की, नाशिक मंडळाची ही सोडत दोन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. सोडतीत २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत एकूण ३०० सदनिकांचा समावेश असून ऑनलाइन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा

करण्यासाठी https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळाला इच्छुक अर्जदारांनी भेट द्यावी.

तसेच २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील प्रथम येणार्या स प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत २०२ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी https://lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अनामत रकमेचा भरणा अर्जदाराने करण्याचे आवाहन मंडळाने करण्यात आले आहे. तसेच सदनिका सोडतीसंदर्भातील माहिती पुस्तिका https://lottery.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर इच्छूक अर्जदारांकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्याबाबतची सविस्तर माहिती, नियमावली, मार्गदर्शक सूचना नमूद करण्यात आली आहे. सर्व इच्छूक अर्जदारांनी सोडतीत सहभाग घेण्याआधी या माहिती पुस्तिकेचे अवलोकन करण्याचे आवाहन मंडळाने केले आहे.

नाशिक मंडळाच्या सोडतीत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना मुख्य अधिकारी श्री. आवळकंठे यांनी आवाहन केले आहे की, मंडळातर्फे सदनिकांच्या वितरणासाठी कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये तसे केल्यास नाशिक मंडळ अथवा म्हाडा प्रशासन कोणत्याही व्यवहारास / फसवणूकीस जबाबदार राहणार नाही. तसेच म्हाडाची IHLMS 2.0 ही संगणकीय प्रणाली अत्यंत पारदर्शक, सोपी व सुलभ आहे करिता इच्छुक अर्जदारांनी याच सोडत प्रणालीच्या सहाय्याने सोडत प्रक्रियेमध्ये सहभाग घ्यावा.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Phone No:- 022 66405066/77 Email : cpromhadaoffice@gmail.com
==============================================================

Outward No. : 718/30 Dt. March 6, 2025

Press Release

# MHADA Nashik Board extends the deadline for submitting online applications for the sale of 502 flats until March 20

Online/Offline Earnest Money Deposit (EMD) will be accepted until March 21.

Mumbai, March 6, 2025 – The Nashik Housing and Area Development Board, a regional unit of MHADA, has extended the deadline for submitting online applications for the sale of 502 flats under the 20 percent inclusive housing scheme across multiple locations in Nashik, including Makhmalabad, Satpur, Pathardi, Vihitgaon, Hirawadi, Mhasrul, Tapovan Dwarka, Wadala Nashik, Pimpalgaon Bahula, Nandur Dasak, Deolali, and Mouje Dasak. Applicants can now register and submit their applications online until March 20, 2025, at 11:59 PM, as announced by Nashik Board's Chief Officer, Mr. Shivakumar Awalkanthe.

Online registration for the Nashik Board's housing lottery began on February 7, 2025, at 2:30 PM. As per the revised schedule, Earnest Money Deposit (EMD) payments will be accepted online until March 21, 2025, at 11:59 PM, while payments through RTGS/NEFT can be made until March 21, 2025, at 4:00 PM. The final list of approved applications will be published on April 9, 2025, at 6:00 PM on MHADA's official website https://housing.mhada.gov.in. The lottery draw date and time will be announced separately, as stated by Mr. Awalkanthe.

The Nashik Board's housing lottery has been divided into two components. A total of 300 flats are available under the 20 percent inclusive housing scheme, and interested applicants must visit https://housing.mhada.gov.in to register and submit their applications. Additionally, 202 flats are available under the first-come, first-served scheme within the 20 percent inclusive housing scheme, for which applicants must register and pay the EMD through https://lottery.mhada.gov.in. The detailed information booklet, including guidelines, regulations, and instructions regarding the lottery process, is available on https://lottery.mhada.gov.in. All applicants are advised to carefully review the booklet before participating in the lottery process.

Chief Officer Mr. Awalkanthe has appealed all interested applicants to note that MHADA or the Nashik Board has not appointed any representative, consultant, or property agent for the

sale of these flats. Applicants should refrain from engaging in any financial transactions with unauthorized individuals, as MHADA or the Nashik Board will not be responsible for any fraudulent dealings. The IHLMS 2.0 system used for the lottery is completely transparent, simple, and user-friendly. Therefore, applicants are encouraged to apply only through the official lottery system to ensure a fair and smooth process.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA